दै. पुण्यनगरी दि. 07-12-23

# जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद

## २४ तासात केली गुन्ह्याची उकल

**नांदेड /प्रतिनिधी**

नांदेड शहरातील ऑटोमध्ये ज्येष्ठ नागरिकांवर पाळत ठेवून जबरी चोरी करणारी टोळी वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने ४ जणांना जेरबंद करण्यात यश मिळविले.

दि. ४ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता वाशिम जिल्ह्यातील ६३ वर्षीय सुवर्ण कारागीर पत्नीसह नांदेडात आला होता. ते काम आटोपून रात्री राज्य परिवहन महामंडळाच्या बसने जाण्यासाठी शहर बसस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानकादरम्यान एम.एच.२६ एन ५६२६ क्रमांकाच्या ऑटोने निघाले. ऑटोत या अगोदर २ जण समोर आणि एक जण मागे बसलेला होता. ऑटो चालकासह तिघांनी ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या ६० वर्षीय पत्नीला खाली उतरवून शिविगाळ केली आणि दमबाजी केली. धाक दाखवत त्याच्या खिशातील १३ हजार रुपये, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड जबरदस्तीने काढून घेतले. या प्रकरणी वजिराबाद पोलिस ठाणे गुरनं ५५५/२३ दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर या घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी या घटनेतील आरोपींचा शोध सुरु करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील उपनिरीक्षक प्रवीण आगलावे, अंमलदार दत्तराम जाधव, जमादार विजयकुमार नंदे, पोलीस नायक शरदचंद्र चावरे, पोकॉं अरुण साखरे, शेख इमरान, रमेश सूर्यवंशी, भाऊसाहेब राठोड यांनी परिसरातील माहिती एकत्रित करुन बसस्थानक परिसरात फिरणारे संशयित शेख हाजी शेख खालेद (३२,रा.नई आबादी, नांदेड), मंगेश सोनकांबळे (३०, रा.आंबेडकरनगर, नांदेड) ,शेख बाबु शेख फरीद (४३, नई आबादी नांदेड) ,शेख वसीम ऊर्फ लंगडा शेख सत्तार (२७, रा.नई आबादी, नांदेड) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एम.एच.२६ एन ५६२५ हा ऑटो ताब्यात घेतला आहे. या आरोपींना तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे यांनी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणी सरकारी अभिवक्ता म्हणून श्रीमती एस.बी. जोहिरे यांनी काम पाहिले.या पथकाचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व सहकाऱ्यांनी कौतुक केले आहे.



# पती-पत्नीला लूटले

**नांदेड /प्रतिनिधी**

शहर बसस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे ऑटोने जाताना ऑटो चालकासह तिघांनी पती-पत्नीला लुटल्याची घटना दि. ४ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता घडली.

शहरातील शहर बसस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे वाशिम येथील व्यापारी शिवकुमार वर्मा व त्यांची पत्नी ऑटोने निघाले. दि. ४ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता ऑटोचालकासह इतर तिघांनी शिवकुमार वर्मा यांना ऑटोतून उतरविले आणि खिशातील १३ हजार रुपये, एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड काढून घेतले. शिविगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात वर्मा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुरनं ५५५/२३ दाखल झाला.उपनिरीक्षक प्रवीण आगलावे अधिक तपास करीत आहेत.